Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**प्राधिकृत प्रकाशन**

वर्ष ७, अंक ३६] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर ४-१०, २०२१/कार्तिक १३-१९, शके १९४३ [ पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६२.

### जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांजकडून

**वाचावे** :- (१) सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा यांचे पत्र जा. क्र. बासभं/३०/२०२१, दिनांक ०३/०९/२०२१.

(२) महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ५ {२}.

(३) मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांचे आदेश जा. क्र. रा.मा.क्र. ०६/एलएनए-२२-२०२०-२१, दिनांक ०८-०६-२०२१.

(४) या कार्यालयाची प्रारंभिक अधिसूचना जा. क्र. जिउनि-भं-पणन-कृउबास-भं-उपबाजार-प्रारंभिक अधिसूचना-२४२४-२०२१, दिनांक ०६-०९-२०२१.

### अंतिम अधिसूचना

क्रमांक जिउनि-भं-पणन-कृउबास-भं-उपबाजार-अंतिम अधिसूचना-२८५८-२०२१.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियम) अधिनियम, १९६३ चे कलम ५, पोट-कलम २ अन्वये व मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. सीएमआर-आर-३५-ॲक्ट ॲंड रुल्स, दिनांक १८ सप्टेंबर, १९८१ अन्वये निम्नस्वाक्षरीकारास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा च्या क्षेत्रात नियंत्रित व उद्योचित केलेल्या शेतमालाच्या खरेदी-विक्रीचे नियमन करण्याकरीता उक्त नमूद केलेली गट क्र. ९४/१ मधील क्षेत्र ९.३५ हे. आर पैकी क्षेत्र ३.६० हे. आर ही जागा ज्याची चतु:सिमा वर दर्शविलेली आहे. ही जागा " जय किसान उपमार्केट यार्ड भिलेवाडा " कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा म्हणून समजण्यात येईल. असा आपला इरादा या कार्यालयाचे वाचावे क्र. (४) नुसार दिनांक ०६ सप्टेंबर २०२१ रोजी प्रारंभिक अधिसूचना निर्गमित करून, शासनाच्या दि. २३-९-२०२१ च्या राजपत्रात जाहीर केली आहे. आणि,

ज्याअर्थी, वरील अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ३५ दिवसाचे आत सूचना व हरकती मागविण्यात आल्या असत्या, कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडाराचे " जय किसान उपमार्केट यार्ड भिलेवाडा " अधिसूचित करण्यास कोणाकडूनही सूचना किंवा हरकती या कार्यालयास विहित मुदतीत प्राप्त झालेल्या नाहीत.

त्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री ( विकास व विनियमन ) अधिनियम, १९६३ चे कलम ५, पोट-कलम २, अन्वये व मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. सीएमआर-आर-३५-ॲक्ट ॲंड रुल्स, दिनांक १८ सप्टेंबर १९८१ अन्वये निम्नस्वाक्षरीकारास प्रदान

करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी, एम. एम. देशकर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा जाहीर करीत आहे की, ही अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील मौजा भिलेवाडा येथील खाली नमूद केलेले क्षेत्र कृषि उत्पन्न बाजार समिती, भंडारा च्या क्षेत्रात नियंत्रित व उद्घोषित केलेल्या शेतमालाच्या खरेदी-विक्रीच्या नियमनाकरीता " जय किसान उपमार्केट यार्ड भिलेवाडा " म्हणून समजण्यात येईल.

(अ) वापराची जागा :- मौजा भिलेवाडा, ता. जि. भंडारा येथील
गट क्र. ९४/१ मधील क्षेत्र ९.३५ हे. आर
पैकी क्षेत्र ३.६० हे. आर ही जागा

(ब) चतुःसिमा :- पूर्वेस :- नहर

पश्चिमेस :- मौजा गिरोला सरहद्द.

उत्तरेस :- जूना राष्ट्रीय महामार्ग क्र. ६.

दक्षिणेस :- नवीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ६.

सदर्हू अंतिम अधिसूचना आज दिनांक ११ ऑक्टोबर २०२१ रोजी माझे सही व शिक्यानिशी जाहीर करीत आहे.

**एम. एम. देशकर,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, भंडारा.

भंडारा :
दिनांक ११ ऑक्टोबर २०२१.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६३.

**मुख्याधिकारी, नगर पंचायत, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) नुसार जिवती नगर पंचायत क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्याबाबत.**

क्रमांक नपंजि-सा.प्र.वि.-९१२-२०२१.—

शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. MUN-२०१४-प्र.क्र.१०१-नवि-१८, दिनांक १७ जून २०१५ अन्वये नगर पंचायत जिवती नव्याने अस्तित्वात आलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अन्वये नगर पंचायत क्षेत्राच्या नियोजनबद्ध विकास होण्यासाठी विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) चे अन्वये नगर पंचायत जिवती क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी ठराव क्रमांक १, दिनांक १४ जून २०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(२) नुसार जिवती नगर पंचायत विकास योजनामध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा हद्द दर्शवणारा व मुख्याधिकारी यांनी स्वाक्षांकित केलेला नकाशा, नगर पंचायतीच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या या बाबत काही सूचना/हरकती असतील त्यानी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्धी होईल त्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत मुख्याधिकारी, जिवती नगर पंचायत यांच्याकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करताना त्या सूचना / हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

**कविता गायकवाड,**
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, जिवती.

जिवती :
दिनांक १४ ऑक्टोबर २०२१.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६४.

BY CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT

**Declaration of intention to prepare Development Plan of Jiwati Nagar Panchayat as per Section 23(*1*) read with Section 21(*2*) of Maharashtra Regional And Town Planning Act, 1966.**

No. NP-Jiwati-GAD-912-2021.—

Government of Maharashtra, Urban Development Department *vide* it's Notification No. MUN-2014-C.R.99-UD-18, Dt. 17-6-2015 constituted Jiwati Nagar Panchayat. It is necessary to prepare the Development Plan for the area of Nagar Panchayat as per Section 21*(2)* of Maharashtra Regional And Town Planning Act, 1966 for planned development of the said area.

Hence, the Jiwati Nagar Panchayat by its Resolution No.1, Date 14-6-2021 has given consent to declare intention to prepare Development Plan of Jiwati Nagar Panchayat as per Section 23(*1*) read with Section 21*(2)* of Maharashtra Regional And Town Planning Act, 1966. According this notice is beging published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of the Jiwati Nagar Panchayat is kept open for inspection by the public on office working day during office hours at the office of the Nagar Panchayat, as required under Section 23*(2)* of the Maharashtra Regional And Town Planning Act, 1966.

Any suggestion/objections of the public in this regard may be forwarded in working to the Chief Officer, Jiwati Nagar Panchayat within a period of 60 (Sixty) days from the date of Publication of this notice in *Maharashtra Government Gazette*. The suggestion/objections shall be duly considered while preparing the Development Plan.

KAVITA GAYKAWAD,
Chief Officer,
Nagar Panchayat, Jiwati.

Jiwati :
Dated the 14th October 2021.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.